# जिल्हा व सत्र न्यायालय, बीड
## जाहीर लिलावाच्या सुचना व अटी व शर्ती

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड यांचे न्यायालयातील खालील तपशीलाप्रमाणे शासकीय वाहनाची विक्री जाहीर लिलावाद्वारे आहे त्या स्थितीत करावयाची आहे.

| लिलाव करावयाच्या वाहनाचा तपशील | निर्मिती वर्ष | एकुण संख्या |
|---|---|---|
| मारुती ओमीनी पेट्रोल व्हॅन कमांक **( एमएच – 23 बी. 1902 )** **दि. 20/11/1995 जिल्हा न्यायालय, बीड यांनी खरेदी केलेली** | **1996** | **एक** |

1) उपरोक्त वाहनाचा जाहीर लिलाव जिल्हा न्यायालय, बीड च्या परिसरात **दिनांक 13/03/2019 रोजी सकाळी 11–00** वाजता सुरू होईल.

2) लिलाव करण्यात येणारे वाहन कार्यालयीन वेळेत दूपारी 3 ते 5 वाजेपर्यंत पहावयास मिळेल.

3) इच्छूकांनी लिलावाच्या बोलीमध्ये भाग घेणेस्तव लिलाव सुरू होण्यापूर्वी आपले नांव, पुर्ण पत्ता , मोबाईल कमांक व आय.डि. ( आधार कार्ड / पॅन कॉर्ड / मतदान कार्ड / ड्रायव्हींग लायसन्स ) देवून अनामत रक्कम रूपये 10000/– ही सहायक अधिक्षक वित्त विभाग जिल्हा न्यायालय, बीड येथे भरणा करून नांव नोंदवावे, त्याशिवाय त्यांना लिलावात भाग घेता येणार नाही. ज्याची बोली स्विकारली नाही त्यांची अनामत रक्कम लगेच परत करण्यांत येईल.

4) लिलावामध्ये सर्वात जास्तीची बोली बोलणा–यास व बोलीची रक्कम सक्षम अधिका–यास योग्य वाटल्यास व ती मान्य झाल्यास संबंधितास बोलीची पुर्ण रक्कम त्याचदिवशी भरणा करावी लागेल आणि उक्त वाहन जसे आहे त्याच स्थितीत स्वखर्चाने घेवून जावे लागेल.

5) यशस्वी बोलीदाराला विकत घेतलेल्या गाडीच्या संपुर्ण रकमेवर नियमानुसार विक्रीकर व ईतर सर्व प्रकारचे कर व शुल्क भरणे बंधनकारक राहील. कोणतीही सुट मिळण्याचे प्रमाणपत्र लिलाव खरेदीसाठी ग्राहय धरले जाणार नाही.

6) लिलाव झाल्यानंतर या बाबतीत कुठल्याही / कोणत्याही हक्क किंवा तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

7) लिलावात विक्री केलेले वाहन कुठल्याही सबबीवर परत घेतले जाणार नाही.

D:\Account\Dead stock\Letter Aunction.odt

8) काही अपरिहार्य कारणास्तव जाहीर लिलाव निर्देशीत तारखेस न झाल्यास त्याबद्दलची पुढील तारीख व वेळ त्याचवेळेस कळविण्यांत येईल. तसेच योग्य किंमत न आल्यास लिलावाची कार्यवाही स्थगीत करण्याचे अधिकार प्रमुख जिल्हा न्यायाधीश, बीड यांनी राखून ठेवलेले आहेत. लिलावाच्या शासकीय प्रचलीत अटी व शर्ती लागू राहतील.

आदेशावरून,

सहायक अधिक्षक,
लेखा व वित्त विभाग,
जिल्हा न्यायालय, बीड

**पृष्ठांकन क्रमांक 9892 /2019**
**दिनांक 25/02 /2019**
**जिल्हा व सत्र न्यायालय, बीड**

**प्रतिलिपी :–**

1) मा. जिल्हाधिकारी, बीड.
2) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड.
3) मा. जिल्हा माहिती अधिकारी, बीड.
4) मा. जिल्हा न्यायाधीश–1 अंबाजोगाई / माजलगांव.
5) मा. दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड
6) दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आष्टी / गेवराई / पाटोदा / केज / धारूर / परळी / शिरूर कासार / वडवणी.
7) नोटीस बोर्ड, तहसील कार्यालय, बीड
8) नोटीस बोर्ड, नगर परिषद कार्यालय,बीड.
9) नोटीस बोर्ड, पंचायत समिती कार्यालय, बीड.

यांना देवून कळविण्यांत येते की, उपरोक्त जाहीर लिलावाच्या सुचनेस न्यायालयाच्या व स्थानिक कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात येवून योग्य ती प्रसिध्दी देण्यात यावी.

10) संगणक प्रमुख, जिल्हा न्यायालय, बीड यांनी न्यायालयाच्या वेबसाईटवर / संकेतस्थळावर टाकण्यात यावी.
11) मुख्य बेलिफ, दि.न्या.व.स्तर, बीड – यांनी आपल्या कार्यालयाच्या बेलिफा मार्फत जिल्हा न्यायालयाच्या नोटीस बोर्डवर व दिवाणी न्यायालय, वरीष्ठ स्तर यांचे नोटीस बोर्डवर डकवुन त्याचा अहवाल सादर करण्यात यावा.
12) कार्यालयीन संचिका.

जिल्हा न्यायालय, बीड.
दिनांक :– 25 / 02 /2019

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, बीड.

D:\Account\Dead stock\Letter Aunction.odt